# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०१ जुलै, २०१९ / आषाढ १०, १९४१ ( शके )**

**(१) उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, संसदीय कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री**
**(२) पर्यावरण मंत्री**
**(३) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
**(४) अन्न व औषध प्रशासन मंत्री**
**(५) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण मंत्री**
**(६) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३३**

---

### जेऊर, कोर्टी, बोरगाव व कव्हे (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील प्रादेशिक पाणी पुरवठा योजना सौर उर्जेवर स्वयंचलीत करण्याबाबत

**(१) * १३९०९८ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेऊर, कोर्टी, बोरगाव व कव्हे (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील प्रादेशिक पाणी पुरवठा योजना स्वयंचलीत करुन सौर उर्जेवर चालविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.वित्त व नियोजन मंत्री व मा.पाणी पुरवठा मंत्री यांचेकडे दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) सौर उर्जा प्रकल्पासाठी जेऊर योजनेसाठी ३३३ Kw, कोर्टी योजनेसाठी २५० Kw, बोरगाव योजनेसाठी १२५ Kw व कव्हे योजनेसाठी २५० Kw नेट मिटरिंग व्यवस्थेची आवश्यकता आहे.

सौर उर्जा प्रकल्पासाठी विजेचा वापर होतो त्याठिकाणी प्रति किलोवॅट १०० चौ.फूट प्रमाणे जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. तसेच नेट मिटरींगसाठी महाराष्ट्र वीज वितरण कंपनीकडे अर्ज करतेवेळी १०० % विज देयक अदा केलेले असणे आवश्यक आहे. तथापि, नेट मिटरिंग व्यवस्था उभारणीसाठी आवश्यक असणारी जागा अद्याप उपलब्ध झाली नाही व जेऊर, कोर्टी, बोरगाव व कव्हे योजनांची विद्युत देयके थकित आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: पश्चिम विदर्भातील भूजल पातळीत वाढ करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याबाबत

**(२) * १३५२२९ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय केळकर (ठाणे), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ८२ टक्के भूभाग हा बेसॉल्ट खडकाचा असल्याने यंदा कमी पाऊस, सिंचनासाठी होणारा पाण्याचा उपसा, सिंचनाच्या पारंपारिक पद्धतीत होणारी वाढ आदींमुळे पाणी साठवण क्षमता कमी असल्याचे सर्वेक्षण भूजल

यंत्रणा संचालनालयातफे नोंदविण्यात आल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पश्चिम विदर्भातील ४९ तालुक्यातील भूजल पातळीमध्ये तीव्र प्रमाणात घट झाल्याचे निदर्शनास आले असून अमरावती महसूल विभागातील ६७१ निरक्षण विहिरींच्या पाण्याची पातळी तपासणीअंती मागील (२०१७-१८) वर्षीच्या तुलनेत सरासरी ३ मिटर पेक्षा जास्त खाली गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील ३५८ पैकी १७८ तालुक्यांमध्ये ५६१४ गावांमध्ये मार्च, २०१९ च्या अखेरीस पाण्याची टंचाई निर्माण झाली असून भूजल सर्वेक्षण व विकास (जीएसडीए) यंत्रणेच्या अहवालानुसार या गावातील भूजल पातळीत १ ते २ मीटरने घट झाल्याने पाण्याचे स्त्रोत आटत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्रीय भूजल मंडळाच्या अहवालानुसार वाढती लोकसंख्या आणि घटणारे पाण्याचे प्रमाण लक्षात घेता सन २०५० पर्यंत ११४० घनमीटर एवढे पाणी कमी होणार असल्याने प्रदुषित जल आणि सांडपाण्यावर प्रक्रियेनंतर त्याचा पुनर्वापर होणे गरजेचे असल्याचे मत पर्यावरण तज्ज्ञांनी व्यक्त केले असून नवीन भूजल कायद्यान्वये बोअरवेलची खोली २०० फुटापेक्षा अधिक नसावी असेही निर्देश शासनाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पाणी उपसा, कमी पर्जन्य, असंतुलित पर्यावरण, वाढते तापमान लक्षात घेता भूजल पातळीमध्ये वाढ करण्यासाठी शासन धोरण, आखणी नियोजन व अंमलबजवणीसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे तसेच सदर गावातील पाणी टंचाई निवारणाकरिता कृती आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) राज्याच्या एकुण क्षेत्रफळापैकी ८२% भूभाग हा बेसॉल्ट नावाच्या कठीण अशा अग्निजन्य खडकाने व्यापलेला असून त्यामध्ये पाणी साठवण्याची क्षमता अत्यंत कमी  (१ ते ३ %) आहे. पर्जन्यमानातील

दोलायमानता, भूजलाचा सिंचनाकरीता होणारा अति उपसा, सिंचनासाठी वापरण्यात येणारी पारंपारिक प्रवाही पध्दत व त्याद्वारे पाण्याचा होणारा अपव्यय ही भूजल पातळीत होत असलेल्या घटीची कारणे आहेत.

(२) हे खरे नाही.

अमरावती विभागामध्ये एकुण ६५८ निरिक्षण विहिरी निश्चित केलेल्या आहेत. माहे मार्च,२०१९ च्या भूजल पातळीची मागील ५ वर्षातील मार्च महिन्यातील सरासरी भूजल पातळाशी तुलना केली असता, २४६ निरिक्षण विहिरींमध्ये १ मीटर पेक्षा कमी भूजल पातळीत घट, १९७ निरिक्षण विहिरींमध्ये १-२ मीटर भूजल पातळीत घट, ४७ निरिक्षण विहिरींमध्ये भूजल पातळीमध्ये २-३ मीटरने घट व ४० निरिक्षण विहिरांची भूजल पातळीत ३ मीटर पेक्षा जास्त घट झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच उर्वरित १२८ निरिक्षण विहिरींमध्ये भूजल पातळीत घट आढळून आलेली नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

मार्च २०१९ अखेर राज्यातील टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या गाव व वाड्यांची संख्या अनुक्रमे २६२९ व ६३१७ अशी होती. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत राज्यात निश्चित करण्यात आलेल्या ३९२० निरिक्षण विहिरींची भूजल पातळी माहे मार्च, २०१९ अखेर घेण्यात आलेली आहे. माहे मार्च,२०१९ मधील निरिक्षण विहिरींच्या भूजल पातळींची मागील पाच वर्षांच्या भूजल पातळीच्या सरासरीशी तुलना केली असता, १३१८ निरिक्षण विहिरींमध्ये भूजल पातळीत १ मीटरपेक्षा जास्त घट आढळून आली आहे. सदर निरिक्षण विहिरींच्या प्रभाव क्षेत्रामध्ये १७५ तालुक्यामधील १०३६६ गावांचा समावेश असून ह्या गावात टंचाई दिसून आली आहे.

(४) केंद्रीय भूजल मंडळाच्या अहवालानुसार भविष्यात होणा-या पाण्याच्या कमतरतेमुळे प्रदूषित जल आणि सांडपाण्यावर प्रक्रियेनंतर त्याचा पुनर्वापर होणे गरजेचे असल्याचे मत पर्यावरण तज्ज्ञांनी व्यक्त केल्याबाबत विभागास माहिती नाही. तथापि महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ मधील कलम ८ (२) नुसार सिंचन व औद्योगिक वापराकरीता ६० मीटर (२०० फुट) पेक्षा जास्त खोलीची विहिर/ विंधन विहिर/ कुपनलिका खोदण्यास मनाई आहे.

(५) राज्यामध्ये सातत्यपूर्ण भूजल उपलब्ध व्हावे तसेच भूजलाचे स्त्रोत संरक्षित करण्यात यावेत यासाठी भूजलाचे विकास व व्यवस्थापन करण्याकरीता महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ राज्यामध्ये १ जून, २०१४ पासून लागू करण्यात आला आहे.

तसेच राज्यातील पाणी टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्याकरीता महाराष्ट्रात जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे. याद्वारे पाणलोटाची कामे, साखळी सिमेंट नालाबांध, जुने अस्तित्वातील नालाबांध, जलस्त्रोतातील गाळ काढणे, जलस्त्रोत बळकटीकरण, विहीर पुनर्भरण यासारखी कामे घेण्यात आली आहेत व येत आहेत.

राज्यातील पाणी टंचाईचा सामना करता यावा यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

१. जिल्हा स्तरावर टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात उप जिल्हाधिका-यांच्या नियंत्रणाखाली टंचाई नियंत्रण व समन्वयासाठी एक स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आला.

२. पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या भागात टँकर्स मंजुरीचे अधिकार उपविभागीय अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत

३. खाजगी विहिर अधिग्रहणाचे दर वाढविण्यात आले आहेत.

४. राज्यातील दुष्काळ घोषित भागातील नळ पाणी पुरवठा योजनांची थकित विद्युत देयकांची ५% रक्कम टंचाईमधून भरुन योजना पुन्हा सुरु करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

५. टंचाई अंतर्गत उपाययोजनांसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यास निविदाचा कालावधी कमी करण्यात आला आहे.

६. शासन निर्णय दि.२०.०६.२०१९ अन्वये सन २०१८-१९ मध्ये टंचाई अंचर्गत उपाययोजनांसाठी रु.६७२.५६ कोटी व सन २०१९-२० मध्ये रु.३२०.३३ कोटी निधी क्षेत्रीय कार्यालयांना वितरित केला आहे.

७. टंचाई अंतर्गत निधी वितरित करण्याच्या पध्दतीत सुधारणा करण्यात आली असून हा निधी जिल्हा परिषदा तसेच महारष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे थेट वितरीत करण्यात येत आहे.

८. राज्यात सुरु करण्यात आलेल्या चारा छावण्यातील जनावरांसाठी टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

९. टंचाई कृती आराखडा (ऑक्टोबर २०१८ ते जून २०१९) अंतर्गत गाव व वाड्यांमध्ये पाण्याकरीता एकुण ८०१३१ उपाययोजना प्रस्तावित केलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात प्लास्टिक बंदी कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(३) * १४००१७ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक २३ जून, २०१८ रोजी प्लास्टिक बंदीचा निर्णय घेतल्यानंतर आतापर्यंत ६० हजार किलो प्लास्टीक जप्त केले असून सदर प्लास्टिकची विल्हेवाट लावण्यासंदर्भात शासनाने काय उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(२) असल्यास, साताऱ्यासह राज्यातील अनेक बाजारपेठामध्ये फळ विक्रेत्यांकडून, दुकानदार व व्यापाऱ्यांकडून बंदी घातलेल्या प्लास्टिकचा वापर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्ते तयार करण्यासाठी वापरण्यात येणा-या मटेरियलमध्ये १० टक्के प्लास्टिकचा वापर केल्यास रस्ते मजबूत होतील असा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्त्याच्या कामासाठी प्लास्टिकचा वापर करण्याबाबत तसेच प्लास्टिक बंदी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) पुणे जिल्हयामधील नगरपालिका व नगरपंचायती यांचेमार्फत संयुक्तरित्या राबविण्यात आलेल्या धडक कारवाई दरम्यान अंदाजे ६३८०० किलो इतके प्रतिबंधीत प्लास्टीक जप्त करण्यात आले होते. त्यापैकी

काही नगरपालिकांनी सदर प्लास्टीक पुनर्चक्रण उद्योगांना पुढील प्रक्रियेसाठी व काही नगरपालिकांकडून नगरपरिषदेच्या ठेकेदारास रस्ते विकास कामासाठी दिले जावून त्याचा वापर रस्ते बनविण्याकरीता करण्यात येत असल्याचे कळविलेले आहे.

(२) हे पुर्णतः खरे नाही.

तथापि, सातारा जिल्हयातील नगरपालिका व नगरपंचायत व प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची संयुक्त टीम करुन शहरामध्ये बाजारपेठा, फळविक्रेते, दुकानदार, व्यापारी यांचेवर वारंवार धाडी टाकण्यात आलेल्या आहेत व प्लास्टिक जप्त करुन दंडही आकारण्यात आलेला आहे. दंडाची रक्कम रुपये ७,९२,२००/- इतकी आहे आणि नगरपरिषदेमार्फत प्लास्टीक बंदी संदर्भात पथनाटय, चर्चा सत्र, संबोधन पर भाषणे इत्यादींच्या माध्यमातून नागरिकांमध्ये प्रबोधन करुन प्लास्टीकचा वापर बंद करणेबाबत जनजागृती करण्यात आलेली आहे.

(३) राज्यात सर्वत्र प्लास्टिक बंदीच्या धोरणामुळे सद्यस्थितीत मोठया प्रमाणात उपलब्ध असलेल्या निरुपयोगी प्लास्टिकचा रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामामध्ये जास्तीत जास्त वापर करावा असा शासन निर्णय दिनांक २१ जून, २०१८ अन्वये पारित करण्यात आला आहे.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींसमवेत प्लास्टिक बंदीच्या अनुषंगाने केलेल्या संयुक्त कारवाईमध्ये दि. ५ जून २०१९ पर्यंत एकूण ६३६९ दुकानांवर/आस्थापनांवर कारवाई करण्यात आली असून एकूण रु ४,१२,२०,५८८/- एवढा दंड गोळा करण्यात आला आहे. या कारवाई दरम्यान जवळपास ८,३६,८७५ किलो ग्रॅम इतका प्लास्टिक साठा जप्त करण्यात आला. तसेच म.प्र.नि. मंडळाने दोषी आढळेल्या एकूण २७३ कारखान्यांना उत्पादनबंदचे आदेश बजावण्यात आले असून एकूण रु. ४,२०,०००/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे. या कारवाई दरम्यान जवळपास २,४१,६७० किलो ग्रॅम इतका प्लास्टिक साठा जप्त करण्यात आला आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## मानखुर्द मंडाळा परिसरात (मुंबई) वाशी खाडीच्या नाल्यात बेकायदा रसायनमिश्रित तेल सोडण्यात येत असल्याबाबत

**(४) * १४०२९० श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडाळा कुर्ला स्क्रॅप परिसरात (मानखुर्द, मुंबई) वाशी खाडीच्या नाल्यात बेकायदेशीररित्या रसायन मिश्रीत तेल सोडण्यात येत असल्याने वनस्पती आणि जलचरांची हानी होण्याबरोबरच रोहित पक्ष्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असून रसायनांमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण झाला असल्याचे दिनांक १७ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परिसरात बांधण्यात आलेल्या बेकायदा गाळ्यांमध्ये धोकादायक ज्वालाग्राही साहित्य साठवले जाते त्यामुळे यापरिसरात भीषण आग लागण्याच्या घटना घडतात, आगीनंतर पुन्हा बेकायदेशीरपणे गाळे उभारले जातात तसेच आजूबाजूच्या मोकळ्या जागेतही अनधिकृत गाळे बांधण्यात येतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कुर्ला स्क्रॅप परिसरातील जिल्हयाधिकाऱ्यांच्या अधिपत्याखालील भूखंडावर बेकायदा अतिक्रमण झालेले असून अतिक्रमण झालेल्या जागी मोठ्या प्रमाणात तेल व रसायनांचे पिंप आणून त्यातील रसायने व तेल खाडीच्या पाण्यात सोडण्यात येते त्यामुळे मोठ्या प्रमाणात जलप्रदूषण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१), (२) व (३) सौ.समिक्षा दिपक सक्रे नगरसेविका बृहन्मुंबई महानगरपालिका याची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार प्राप्त झाली होती. तसेच दैनिक सकाळ या वृत्तपत्राच्या बातमीच्या अनुषंगाने

कुर्ला स्क्रॅप परिसरात दिनांक ०६.०३.२०१९ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संयुक्त भेट दिली असता सदर जागेवर विविध प्रकारचे भंगार गोळा करून त्यांचे विलीगीकरणाचे व टाकाऊ तेल साठवण्याचे काम चालू असल्याचे दिसते. त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारचे प्रक्रिया करणारा उद्योग नाही. सदर जागा ही जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर या कार्यालयाच्या अखत्यारीत असल्याने विलगीकरणाचे काम व टाकाऊ तेल साठवण्याचे काम अनधिकृतपणे करण्यात येत असल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक १२.०३.२०१९ रोजी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर याना योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) व (५) जिल्हाधिकारी, कार्यालय मुंबई उपनगर याच्याकंडून त्या कारवाई विरूध्द कुर्ला स्क्रॅप मर्चटस असोसिएशन यांनी मा उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असून सद्यस्थितीत सदरील प्रकरण न्यांयप्रविष्ठ आहे.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यातील क्रीडा संकुलातील जलतरण तलाव बंद असल्याबाबत

**(५) * १४१०३९ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात बांधण्यात आलेल्या क्रीडा संकुलनामधील जलतरण तलाव गत ११ वर्षांपासून बंद असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ११ वर्षांपासून जलतरण तलाव बंद असल्यामुळे स्थानिक जनतेने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलतरण तलाव बांधताना दर्जाहीन निकृष्ट वस्तूंचा वापर केल्यामुळे अल्प कालावधीतच त्याच्या टाईल्स निघाल्या असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जलतरण तलावाच्या दुरुस्ती संदर्भात जलतरण तलाव निर्माण करणाऱ्या एजन्सीने अंदाजपत्रक तयार करुन अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्याकडे तांत्रिक मान्यता घेण्याकरिता पाठविण्यात आलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) व (५) जलतरण तलाव दुरुस्ती संदर्भात रु.२८.७५ लक्षचे अंदाजपत्रक जिल्हा क्रीडा संकुल समितीने मान्य करुन त्यास तांत्रिक मान्यता प्रदान करण्याकरिता अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांच्याकडे सादर केले आहे. परंतु अद्याप तांत्रिक मान्यता प्रदान केलेली नाही. या संदर्भात जिल्हा क्रीडा अधिकारी, हिंगोली यांच्यामार्फत वारंवार पत्रव्यवहार तसेच दुरध्वनीवरुन पाठपुरावा करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भांडूप-सोनापूर (मुंबई) येथील नवदीप कंपनीमध्ये आरएमसी बनविण्याच्या उद्योगाने अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याबाबत

**(६) * १३६२५८ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भांडूप-सोनापूर, एलबीएस रोड (मुंबई) येथील नवदीप कंपनीमध्ये आरएमसी बनविण्याच्या उद्योगाने अटी व शर्तींचे उल्लंघन केल्यामुळे दिनांक १० मार्च, २०१६ रोजी बांधकाम बंद करण्याचे आदेश पारीत केले तद्नंतर पुन्हा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने ५ लक्ष रुपयांची बँक हमी घेऊन नवदीप कंपनीला उत्पादन सुरु ठेवण्याचे आदेश दिनांक २८ एप्रिल, २०१६ रोजी दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००७ पासून आरएमसीचे काम ११ वर्षे नवदीप कंपनी करीत असून त्यावर कोणतीच कारवाई न करता केवळ दिनांक २८ एप्रिल, २०१६ रोजी ५ लक्ष रुपयाची बँक हमी घेऊन सशर्त उत्पादन सुरु करण्याचे आदेश देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, कंपनीच्या या उद्योगामुळे हवा प्रदुषण होवून नागरीकांना त्रास सहन करावा लागत असल्याने कंपनीने हवा प्रदुषण नियंत्रण सयंत्रणेने आधुनिकीकरण केल्याचा अहवाल महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाला सादर करण्यात आला, परंतु या उद्योगाची निरी या संस्थेमार्फत केलेल्या पहाणीत उद्योजक दोषी आढळल्यामुळे नोटीस देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (३) मध्ये दिलेल्या नोटीस संदर्भात केलेल्या कारवाईचा अहवाल प्रदुषण मंडळाने तयार केला आहे काय तसेच आरएमसी या उद्योगासाठी मुंबई महानगरपालिकेचे पिण्याचे पाणी अनधिकृत जोडणीव्दारे वापरले जाते अशाही तक्रारी स्थानिक लोकसप्रतिनिधींनी मुंबई महानगरपालिकेच्या एस विभागाकडे करुनही अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्याची कारणे काय आहेत वा सुरु असलेल्या कारवाईची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) हे खरे आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडुन सदरील उद्योगास दि. १० मार्च २०१६ रोजी उत्पादन बंदचे आदेश देण्यात आले होते. सदरील उद्योगाने म.प्र.नि. मंडळाच्या निर्देशाप्रमाणे अधुनिकीकरणाचे काम पुर्ण केल्याचे कळविल्यानंतर मंडळाकडून उद्योगास भेट देऊन प्रदुषण नियंत्रण संयंत्रना बसवल्याचे पडताळणी करुन ५ लक्ष रुपयाची बॅक हमी घेऊन सशर्त उत्पादन चालू करण्याचे आदेश देण्यात आले होते.

(३), (४) व (५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे मुबईतील आर.एम.सी मुळे होणारे प्रदुषण याबाबतच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदरील आर.एम.सी प्लान्टची संयुक्त पाहणी “निरी” (NEERI) व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाव्दारे दिनांक ९.७.२०१८ रोजी केली होती. सदरील पहाणीदरम्यान उद्योगाने प्रदुषण नियंत्रण सयंत्रणा बसविण्यात आल्याचे निदर्शनास आले होते. परंतू प्रक्रियाकृत सांडपाण्याचा पुनर्वापरासंबंधीची व्यवस्था दिसून न आल्यामुळे सदर उद्योगास दिनांक ०६.०८.२०१८ रोजी समजपत्र देण्यात आले होते. सदरील उद्योगास पुनश्चः दिनांक २०.०९.२०१८

रोजी भेट देण्यात आली तेव्हा आढळलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने सदरील उद्योगास दिनांक १७.११.२०१८ रोजी “कारणे दाखवा” नोटीस बजावण्यात आलेली होती. तदनंतर दिनांक ०४.०६.२०१९ रोजी उद्योगास पुनश्च भेट देऊन भेटीतील त्रुटीनुसार प्रस्तावित आदेश देण्यात आलेले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालानुसार सदर उद्योगास अधिकृतरित्या पाणी पुरवठा केलेला नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडुन सदरील आरएमसी प्लॅन्टला लागणा-या पाण्यासाठी नळ जोडणी दिलेली नाही महानगरपालिकेने दिलेल्या अधिकृत जलजोडणीद्वारे कोणत्याही प्रकारचा गैरवापर दिसून आला नसल्यामुळे तसेच अनधिकृत जलजोडणी स्थळनिरिक्षण दरम्यान आढळून आली नसल्याने कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, असे महानगरपालिकेकडून कळविण्यात आले आहे.

-----------------

## कोकणात विशेषत: रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील कातळशिल्पांचे संशोधन व संरक्षण करण्याबाबत

**(७) * १३६००३ श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात प्रामुख्याने रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयात विविध ठिकाणी प्राचीन मानवी संस्कृतीचा इतिहास उलगडणारी कातळशिल्पे आढळून आली आहेत या कातळशिल्पांचे राज्य संरक्षित स्मारक होण्यासाठी पुरातत्व विभागाकडून शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) शेजवली सडयावरील जांभ्या खडकात कोरलेले लेण्यांचे ऐतिहासिक संशोधन व्हावे अशीही मागणी शिवप्रेमींकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने कोणकोणत्या ठिकाणचे प्रस्ताव शासनाला प्राप्त झाले आहेत, त्यानुसार कातळशिल्पे राज्य संरक्षित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्हयातील १० कातळशिल्पे राज्य संरक्षित करण्याबाबतचे प्रस्ताव पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाकडून शासनास प्राप्त झाले आहे.

(२) अशा कुठल्याही मागणीबाबतचा अर्ज प्राप्त झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हयातील कोळेगाव (ता.कल्याण) तसेच नेवाळी (ता.अंबरनाथ) परिसरात रासायनिक सांडपाणी सोडणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत

**(८) * १४०९३३ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील कोळेगाव (ता.कल्याण) तसेच नेवाळी (ता.अंबरनाथ) परिसरात जिन्स कारखान्यातील रासायनिक सांडपाणी प्रक्रिया न करताच शेतात तसेच गटारात सोडण्यात येत असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर अनधिकृतरित्या जिन्स कारखाने सुरु ठेवून विनाप्रक्रिया सांडपाणी शेतात व गटारात सोडणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) ठाणे जिल्हयातील अंबरनाथ तालुक्यातील नेवाळी परिसरातील खरड व कुशीवली या गावच्या हद्दीतील जिन्स कारखान्यांबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर

तक्रारींनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या पाहणीदरम्यान संबंधित जिन्स उद्योग संमतीपत्राशिवाय सुरु असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे सदर उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून देण्यात आले असून सद्यस्थितीत सदर उद्योग बंद आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दुष्काळी भागात पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरमधील पाण्याची गळती रोखण्याबाबत

**(९) * १३७३१० डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळी भागात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणारे टँकर हे गळके असल्यामुळे पाण्याची गळती होऊन गावात जाईपर्यंत टँकर अर्धा होत असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टँकरला प्रांताधिकारी मंजुरी देतात तर तपासणी व खेपांची शहानिशा तहसिलदारांनी करणे अपेक्षित असताना गळतीकडे मात्र दुर्लक्ष केले जात असल्याने खर्चात वाढ होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गळके टँकर बंद करून सुस्थितीतील टँकरमधून पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) सांगली व सातारा जिल्हयात अशा स्वरुपाची बाब आढळून आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) टँकरमधून वाहतुकीदरम्यान पाणी गळणार नाही, याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना कंत्राटदारास देण्याबाबत तसेच गळतीमुळे विहित प्रमाणपेक्षा कमी पाणीपुरवठा केल्यास अशा फे-या ग्राहय धरण्यात येऊ नयेत अशा सूचना दिनांक २३ मे, २०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या आहेत.

सांगली जिल्हयात संबंधित गळके टँकर बदलण्यात आले आहेत. सातारा जिल्ह्यात गळके टँकर दुरुस्त केलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील सार्वजनिक वाचनालयांना शासकिय मान्यता देण्याबाबत

**(१०) * १४०४६९ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील ३५ सार्वजनिक वाचनालये सन २०१४ पासून शासकिय मान्यतेच्या प्रतिक्षेत असून ठाणे जिल्हा ग्रंथालय संघाच्या पदाधिकाऱ्यांनी माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान वाचनालयांना भेट देऊन पाहणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मान्यता न मिळाल्यामुळे या वाचनालयांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शहापूर तालुक्यातील ३५ सार्वजनिक वाचनालयांना शासकिय मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे का आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) हे खरे नाही. जिल्हा ग्रंथालय संघ, ठाणे या शासनमान्य ग्रंथालय संघाने ठाणे जिल्ह्यातील २२ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना दि.२९ आणि ३० मार्च, २०१९ रोजी भेट दिली आहे.

सदर ग्रंथालये ही शासन मान्य सार्वजनिक ग्रंथालये असल्याने मान्यतेबाबत प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यात पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरची चौकशी करण्याबाबत

**(११) * १३७४७४ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यात माहे एप्रिल, २०१९ च्या अखेरीस पाणीटंचाईची तीव्रता जाणवत असल्याने विहिरींचे अधिग्रहण व टँकर सुरू करण्याचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाण्याच्या टँकरची कागदोपत्री नोंद असून तालुक्यात प्रत्यक्षात टँकरव्दारे पाणी पोहोचत नसल्याने नागरीकांमध्ये असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

उप विभागीय अधिकारी, यवतमाळ यांच्याकडे विहीरींचे अधिग्रहण व टँकर मागणी बाबतचे प्रस्ताव माहे एप्रिल, २०१९ च्या अखेरीस सादर केलेले होते.
(२) हे खरे नाही.
(३) माहे एप्रिल, २०१९ च्या अखेरीस आर्णी तालुक्यात ३६ खाजगी विहीरींचे अधिग्रहण करण्यात आले व पाणी टंचाई असणा-या गावात ०६ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नायशी व कोसबी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील नळपाणी योजनांच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१२) * १४०४३२ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायशी व कोसबी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील नळपाणी योजनांची कामे प्रलंबित असतांनाही कागदोपत्री पूर्ण दाखवून निधी खर्च करण्यात आला असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर योजनांच्या कामांमध्ये गैरव्यवहार झालेला असल्याने चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१), (२) व (३) सरपंच, ग्रामपंचायत, नायशी यांनी याबाबतची तक्रार दिनांक ३१.०५.२०१६ रोजी केली आहे. तसेच महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती कोसबी यांनी दिनांक २५.०२.२०१९ रोजी तक्रार केली आहे. त्यानुषंगाने नायशी नळपाणी पुरवठा योजनेच्या कामाची चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालाच्या अनुषंगाने योजनेमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाला नसल्याचे आढळून आले आहे. तथापि, सदर कामाचे योग्य तांत्रिक मार्गदर्शन न केल्यामुळे संबंधितांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

कोसबी येथील नळपाणी पुरवठा योजनेची चौकशी करण्यासंदर्भातील महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती कोसबी यांच्या दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरीता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गुहागर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११ एप्रिल, २०१९ च्या आदेशान्वये समिती नेमण्यात आली आहे. याबाबतचा चौकशी अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील स्वस्त धान्य दुकानांतील ई-पॉस मशीनमधील त्रुटी दुर करण्याबाबत

**(१३) * १३६७३९ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.सतीश पाटील (एरडोल), श्री.राजन साळवी (राजापूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: सोलापूर, हिंगोली, नाशिक, रत्नागिरी, जळगांव या जिल्हयातील सर्वच स्वस्त धान्य पुरवठा दुकानांमध्ये ई-पॉस मशिनद्वारे धान्य वितरीत केले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात विशेषत: उपरोक्त जिल्हयातील अनेक ठिकाणी ई-पॉस मशीनमध्ये तांत्रिक दोष निर्माण होत असून सर्व्हर डाऊन होत असल्याने मशिन बंद पडत आहेत त्यामुळे नागरीकांना धान्य मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ई-पॉस मशिनच्या देखभाल दुरुस्तीसाठी जिल्हा किंवा तालुकास्तरावर तंत्रज्ञानाची नियुक्ती करणे तसेच गरीब नागरिकांना धान्य मिळत नसल्याने याबाबत योग्य कार्यवाही न झाल्यास रेशन बचाव समिती तीव्र आंदोलन करण्याच्या पवित्र्यात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार ई-पॉस मशीन मधील त्रुटी दूर करुन धान्यपुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे आहे, राज्यातील सर्वच रास्तभाव दुकानांमध्ये पात्र लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पटवून ई-पॉसद्वारे धान्याचे वितरण करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

ई-पॉस मशीनमधील तांत्रिक दोष व सर्व्हर डाऊन होत असल्यामुळे कोणताही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहिल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खामगाव मावळ (ता.हवेली, जि.पुणे) येथील पाणी टंचाईबाबत

**(१४) * १४०१४१ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव मावळ (ता.हवेली, जि.पुणे) येथे भीषण पाणी टंचाई असून पाणी योजना मंजूर असतांना आवश्यक ती कार्यवाही करण्यास संबंधित विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना पूर्ण होण्यासाठी बैठका, पत्रव्यवहार, पाठपुरावा करुनही अद्‌याप कोणतीच कारवाई केली नसल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत असून जनावरांचेही हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) खामगाव मावळ पाणी पुरवठा योजनेच्या रुपये २४४.६६ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकिय कामास तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. निविदा काढण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदगांव तालुक्यासह अन्य काही तालुक्यांमधील (जि.नाशिक) शिधापत्रिका धारकांचा रॉकेलचा पुरवठा बंद झाल्याबाबत

**(१५) * १४०४७५ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव तसेच इतर तालुक्यांमधील (जि.नाशिक) शिधापत्रिका धारकांचा रॉकेलचा पुरवठा बंद करण्यात आला असल्यामुळे नागरिकांना रॉकेल मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशी अहवालानुसार रॉकेलचा पुरवठा पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) व (२) दि.०१ ऑगस्ट, २०१८ पासून केरोसिनचे वाटप PoS व्दारे तसेच लाभार्थ्याकडे शिधापत्रिकाधारकाच्या किंवा कुटूंबातील कोणत्याही सदस्याचे नावे गॅस जोडणी नसल्याबाबतचे हमीपत्र घेऊन करण्यात येत आहे. त्यानुसार नाशिक जिल्हयात हमीपत्र सादर करणा-या लाभार्थ्यांकरिता त्या जिल्हयाच्या मागणीनुसार १०० % केरोसिन नियतन शासनाकडून मंजूर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणी पुरवठा योजना प्रलंबित असल्याबाबत

**(१६) * १४०४०८ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील आदिवासी व दुर्गम भागातील तळे, विहीर, शिंदे, बारी, पेंडशेत, राजुर, टिटवी, शेणित येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजना अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने उक्त पाणीपुरवठा योजना कार्यान्वित होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी बैठका घेवून याबाबत सूचना देवूनही त्या पूर्ण करण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) तसेच अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील धामणगाव आवारी येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची पाणीपुरवठा योजना सन १९९२ पासून सुरु होऊनही अद्यापपर्यंत प्रलंबित असून या योजनेवर रुपये १ कोटी ७५ लक्ष इतका निधी खर्च होवूनही पिण्याचे पाणी उपलब्ध झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त पाणीपुरवठा योजनांसाठी निधी खर्च होवूनही योजना पूर्ण न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच सदर अपूर्ण योजना पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

अकोले तालुक्यातील बारी-पेंडशेत, राजुर, टिटवी या तीन पाणी पुरवठा योजनांची कामे पुर्ण करुन योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत.

तळे-विहीर-शिंदे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना व शेणित पाणी पुरवठा योजना या दोन योजनांची चाचणी घेवून माहे एप्रिल, २०१९ पासून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.
(२) व (३) धामणगाव आवारी ही योजना १९९९ मध्ये मंजूर झाली होती. या योजनेची कामे ६५ टक्के पुर्ण झाली आहेत. योजनेतील मुळ कंत्राटदार कामे करीत नसल्याने त्याच्यावर करारातील कलम क्रमांक ३ (क) अंतर्गत कार्यवाही करण्यात आली आहे. योजनेतील उर्वरित कामांसाठी तीन वेळा निविदा प्रसिध्द करुनही प्रतीसाद मिळाला नाही. धामणगाव आवारी योजनेतील उपांगाचा वापर करुन “अकोले व ३२ गावे” प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून सदर गावाला पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठ व अन्य काही विद्यापीठांमध्ये अनुदान आयोगाच्या राजपत्रित अधिसूचनेनुसार मान्यता नसलेल्या पदव्या देण्यात येत असल्याबाबत

**(१७) * १३७०१० डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मुंबई विद्यापीठ व अन्य काही विद्यापीठांमध्ये अनुदान आयोगाच्या २०१४ मधील राजपत्रित अधिसूचनेनुसार मान्यता नसलेल्या पदव्या दिल्या जात असून सेट सारख्या परिक्षेला सुध्दा सदर विद्यार्थी अपात्र ठरविण्यात आले असल्याचे दिनांक ७ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले व एसएनडीटी विद्यापीठ, पुणे तसेच अमरावती विद्यापीठासह अनेक विद्यापीठांमध्ये बोगस ओळखपत्र व विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसी-युनिव्हर्सिटी ग्रँटस कमिशन) निकष डावलून अपात्र कुलगुरुंची नियुक्ती करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोठ-मोठया पदव्यांची नावे सांगून विद्यार्थ्यांकडून अवाजवी शुल्क आकारणाऱ्या महाविद्यालयांना ही विद्यापीठे अप्रत्यक्षपणे पाठबळ देत असल्याचा आरोप केला जात असून संस्था चालकांच्या हितासाठी असे अभ्यासक्रम चालविले जात असल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, केंद्रीय मनुष्यबळ मंत्र्यांनी जाहीर कार्यक्रमात पदव्यांच्या नावात बदल केले असून युजीसीचे आदेश असतानाही मुंबई विद्यापीठात पदव्यांची नावे बदलण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग कायदा, १९५६ मधील कलम २२ मध्ये नमुद केलेल्या मान्यताप्राप्त पदव्यांच्या नावाच्या यादीप्रमाणेच विद्यापीठांने नावे नमुद करणे आवश्यक आहे. बदलत्या शिक्षण पध्दतीचा वापर केल्यामुळे मुंबई विद्यापीठाने सक्षम प्राधिकरणाच्या संमतीने गरजाधिष्ठीत पदव्या तयार केल्या आहेत. तथापी, यातील काही पदव्यांची नावे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यताप्राप्त पदव्यांच्या नावाच्या यादीशी जुळत नसल्याने या पदव्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत ग्राहय धरल्या जात नसल्याचे समजते मात्र महाराष्ट्र शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या सेट सारख्या परिक्षेला या पदव्यांची कोणतीही अडचण येत नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यताप्राप्त पदव्यांच्या नावाच्या यादी नुसार अशा पदव्यांचे नाव बदलण्याचे तसेच काही पदव्यांची पुनर्रचना करण्याचे काम युध्दपातळीवर सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) यासंदर्भात पदव्यांच्या नावामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार योग्य ते बदल करण्याची कार्यवाही मुंबई विद्यापीठाकडून युध्दपातळीवर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंडवाना (जि.गडचिरोली) विद्यापीठाने पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या निकालात अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्तीर्ण केल्याबाबत

**(१८) * १४०७०५ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडवाना (जि.गडचिरोली) विद्यापीठाने पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सन २०१८ च्या उन्हाळी परीक्षेच्या निकालात अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्तम गुणांनी उत्तीर्ण केल्याचे माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विद्यापीठांनी ज्या विद्यार्थ्यांना ७५ व ५० पैकी शुन्य गुण मिळालेले आहेत त्यांच्या गुणपत्रिकेवर २९ व ३१ गुण दाखवून पास करण्याचा प्रयत्न केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांना मुल्यांकनानंतर उत्तरपत्रिकेमध्ये नमुद केलेल्या गुणांपेक्षा प्रत्यक्ष गुणपत्रिकेत अधिक गुण नोंदवून उत्तीर्ण करण्याचे काम प्रोमार्क सॉफ्टवेअर प्रा. लि. या कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करणाऱ्या प्रोमार्क सॉफ्टवेअर प्रा.लि. च्या कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

उन्हाळी २०१८ च्या पदव्युत्तर परिक्षेमध्ये एकूण ९ विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिकेतील मूळ गुण व गुण पत्रिकेतील मूळ गुणांमध्ये तफावत आढळून आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे व्हॅल्युअर यांनी दिलेले गुण व विद्यार्थ्यांच्या गुणपत्रकेवरील गुणाची पडताळणी करण्याकरिता दोन प्राध्यापकांची समिती गठित करण्यात आली होती सदर समितीने आपला अहवाल सादर केल्यानंतर परिक्षा व मूल्यमापन मंडळाची बैठक घेऊन सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्याकरिता डॉ.एस.एस. कावळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली. सदर समितीने केलेल्या शिफारशीस अनुसरुन मे.प्रोमार्क सॉफ्टवेअर प्रा.लि. कंपनीचे कर्मचारी व छाननी समितीमधील कर्मचा-यांवर पोलीस स्टेशन, गडचिरोली येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच मे.प्रोमार्क सॉफ्टवेअर प्रा.लि. या कंपनीवर रु.५ लक्ष एवढा दंड आकारण्यात येऊन कंपनीकडून तो वसूल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कसबा बावडा (जि.कोल्हापूर) "लक्ष्मी विलास पॅलेस" या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जन्मस्थळ संग्रहालयाच्या कामाबाबत

**(१९) * १३८२९६ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील कसबा बावडा येथील लक्ष्मी विलास पॅलेस या राजर्षि शाहू महाराजांच्या जन्मस्थळ येथे छत्रपती राजर्षि शाहू महाराजांच्या जीवनावर संग्रहालय निर्माण करण्यासाठी शासनाने रुपये २,०८,२९,५६८/- (अक्षरी रुपये दोन कोटी आठ लाख एकोणतीस हजार पाचशे अडुसष्ठ फक्त) इतक्या रकमेस शासन निर्णय दिनांक २१ जून, २०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छत्रपती शाहू महाराज यांच्या जन्मस्थळाचे काम विशेष अधिकार वापरुन पुरातत्व विभागामार्फत करावे अशी मागणी उप समितीने माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त संग्रहालय निर्मितीसाठी पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाच्या स्तरावर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून न्युनतम निविदा धारकास शासन मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संग्रहालय निर्माण करण्याचे काम सुरु केले आहे काय, असल्यास, त्याची सद्यस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) नाही.
(३) होय.
(४) संग्रहालय निर्माण करण्याचे काम सुरु असून सन १९०२ मध्ये छत्रपती शाहू महाराज इंग्लंडला गेले असतानाचा राजदरबारातील फोटोच्या निगेटिव्ह व्हिक्टोरिया अ‍ॅण्ड अल्बर्ट म्युझीअम, लंडन यांचे कडून १० वर्षासाठी मिळवून कॅनवासवर छापून घेवून प्रदर्शित केले आहे. तसेच छत्रपती शाहू महाराजांचे दुर्मिळ फोटो मोठे करणे, खराब झालेले फोटो स्वच्छ करणे, पेंटींगकरिता पदस्थळ बनविणे इ. कामे सध्या सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा, पोखरी, मेहकर व सिंदखेड राजा येथील मंजूर गोदामांचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२०) * १३५६८६ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत ५७६० मेट्रिक टन क्षमतेचे मोताळा, पोखरी, मेहकर व सिंदखेड राजा अशा चार शासकीय गोदामांचे बांधकाम प्रस्तावित असल्याची बाब दिनांक १० फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त गोदाम बांधकामासाठी शासनाने दिनांक १५ फेब्रुवारी, २०१९ रोजी रुपये २,२१,३६,४०५ इतका निधी मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त बुलढाणा सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत मंजूर चार गोदामांचे बांधकाम त्वरित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व सदर गोदाम बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) बुलढाणा जिल्हयातील मोताळा, पोखरी ता.बुलढाणा, मेहकर व सिंदखेड राजा येथील गोदाम बांधकामांना शासन निर्णय, दि.१५.०२.२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

(२) उक्त गोदाम बांधकामांना शासन निर्णय, दिनांक २८.२.२०१९ अन्वये रु.२,१६,४०,९२१/- इतका निधी उपलब्ध करून दिला आहे.

(३) उपरोक्त मंजूर निधी लोकसभा निवडणूक, २०१९ ची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यामुळे खर्च करणे शक्य झाले नाही. त्यामुळे सदर निधीची रक्कम शासनास समर्पित करण्यात आलेली आहे.

सन २०१९-२० मधील नाबार्डच्या मालिका २५ मधील कामांमध्ये उक्त गोदाम बांधकामांचा समावेश करण्यात आला आहे.

-----------------

## राज्यातील विशेषत: सोलापूर जिल्हयातील वयोवृध्द कलाकारांच्या मागण्यांबाबत

**(२१) * १४००८८ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वृध्द कलाकारांकरीता कलाकार महामंडळाची निर्मिती करावी, त्यांच्या मानधनामध्ये ५०००/- रुपयांची वाढ करावी, जिल्हयातील कलाकार निवडताना असलेली प्रतिवर्षी ६० कलाकार निवडण्याची अट वाढवून १२० करावी, कलाकारांच्या उत्पन्नाच्या दाखल्यामध्ये वाढ करणे तसेच मानधनात दीडपट वाढ करणे इ. विविध मागण्यांचे लेखी निवेदन लोकप्रतिनीधींनी मा.मुख्यमंत्री व मा.सांस्कृतिक कार्यमंत्री यांचेकडे दिनांक १७ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील ५० वयोवृध्द कलाकारांना मानधन देण्याचा निर्णय शासनाने घेतला असला तरी सुमारे १ वर्षापासून त्यांना मानधन मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रश्न भाग १ व २ प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वृध्द कलाकारांच्या संख्येत व मानधनामध्ये वाढ करणेबाबत सोलापूर जिल्ह्यातील कलाकारांना मानधन देणे तसेच इतर मागण्या मान्य होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील वृध्द कलाकारांकरिता त्यांच्या मानधनामध्ये रु.५,०००/- ची वाढ करावी, जिल्हयातील कलाकार निवडताना असलेली प्रतिवर्षी ६० कलाकार निवडण्याची अट वाढविण्यात यावी, कलाकारांच्या उत्पन्नाच्या मर्यादेत वाढ करणे तसेच मानधनात दीडपट वाढ करणे इ. प्रकारच्या विविध मागण्यांची निवेदने वेगवेगळया दिनांकांच्या पत्रान्वये प्राप्त झालेली आहेत.

(२) हे खरे नाही.

सोलापूर जिल्हयातील ५० वयोवृध्द कलाकारांना मानधन मंजूर केल्याची यादी स्थानिक प्रशासनाकडून दिनांक ५ मे, २०१८ रोजी प्राप्त झाली होती. माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये या ५० पैकी ४० कलावंतांचे बँक तपशील प्राप्त झाले व माहे जाने. २०१९ पर्यंत ४० कलावंतांच्या खात्यात मानधन रक्कम जमा करण्यात आलेली आहे. उर्वरित १० कलावंतांचे बँक तपशील अद्याप अप्राप्त असून जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडे याबाबत पाठपुरावा सुरु आहे.

(३) वृध्द कलाकारांच्या संख्येत व मानधनामध्ये वाढ करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात खेळाडू निर्माण करण्याच्या दृष्टीने क्रीडागुण देण्याबाबत

**(२२) * १३८६२८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरावर खेळताना पहिल्या तीन क्रमांकात आल्यास ३ गुण, विभाग स्तरावर प्रावीण्य मिळविले तर ५, राज्य स्तरासाठी ७ आणि राष्ट्रीय स्तरासाठी १० असे क्रीडागुण देण्याचा निर्णय दिनांक १८ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा, विभाग, राज्य स्तरावर केवळ सहभागासाठी गुण न देता ६ वी ते १० वी या कालावधीत जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीय स्तरावर जे खेळाडू पहिल्या तीन क्रमाकांत येतील त्यांनाच गुणाचा लाभ मिळणार असून या गुणांस पात्र होण्यासाठी १० वी किंवा १२ वीत स्पर्धेत सहभागी होण्याची अट ठेवण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्षभर मेहनत घेऊन ३, ५, ७ आणि १० असे अल्प गुण मिळणार असल्याने खेळाडूंनी त्यास विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार खेळाडू निर्माण करण्याच्या दृष्टीने क्रीडागुण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे आहे. दि.२०/१२/२०१८ च्या शासननिर्णयानुसार खेळाडू विद्यार्थ्यांना क्रिडा सवलतीचे वाढीव गुण देण्याकरिता नियमावली जाहीर करण्यात आली होती.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) दि.२०/१२/२०१८ च्या शासन निर्णयामध्ये शासन शुद्धिपत्रक दि.२५/०१/२०१९ अन्वये सुधारणा करण्यात आली असून पहिल्या तीन क्रमांकांना जिल्हास्तरासाठी ५ गुण, विभागस्तरासाठी १० गुण, राज्यस्तरासाठी १५ गुण व राष्ट्रीय स्तरासाठी २० गुण असे वाढीव गुण

देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच विभागस्तर, राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावरील सहभागाकरिताही अनुक्रमे ०५, १० किंवा १२ व १५ असे वाढीव गुण देण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

----------------

## जळगाव जिल्हयात अन्नपुर्णा योजनेसाठी धान्य पुरवठा करण्याबाबत

**(२३) * १३९०३४ श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयातील अंध-अपंग, विधवा, एच.आय.व्ही. ग्रस्त, कॅन्सरग्रस्त, तृतीयपंथी यांना सन २०१४ पासून वाढीव अंत्योदय/प्राधान्य योजनेचा लाभ मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव तहसिलतंर्गत (पुरवठा शाखा) अन्नपूर्णा योजनेसाठी गत वर्षापासून २३६ लाभार्थ्यांना धान्य मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर योजनेपासून वंचित लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अंध, अपंग, विधवा, एच.आय.व्ही. ग्रस्त, कॅन्सरग्रस्त, तृतीयपंथी, कुष्ठरोगी इत्यादींना अंत्योदय अन्न योजनेचा लाभ देण्यात येतो. त्यानुसार ४२,९८६ लाभार्थ्यांचा अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थी या योजनांमध्ये समावेश करुन, सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ देण्यात येत आहे.

(२) केंद्र शासनाकडून अन्नपूर्णा योजनेकरिता माहे ऑक्टोबर, २०१५ पासून अन्नधान्याचे नियतन देण्यात आले नसल्याने जिल्हानिहाय नियतन देण्यात

आलेले नाही. तथापि, जळगाव तालुक्यातील अन्नपूर्णा योजनेतील २३३ लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजने अंतर्गत प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांमध्ये वर्ग करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकिय अभियांत्रीकी महाविद्यालय, चंद्रपूर येथील विद्यार्थीनींचे शोषण झाल्याबाबत

**(२४) * १३७७३२ श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकिय अभियांत्रीकी महाविद्यालय, चंद्रपूर येथील विद्यार्थीनींचे संस्थेतील प्राध्यापकांकडून शोषण होत असून संस्थेचे प्राचार्य डॉ.जी.जी. भुतडा हे विद्यार्थीनींना सहकार्य करण्याऐवजी त्यांना दमदाटी करुन परिक्षेत अनुतीर्ण करण्याची धमकी देत असल्याने विद्यार्थीनींनी दिनांक ४ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास पत्रकार परिषद घेवून संस्थेच्या प्राचार्यांची हकालपट्टी करुन निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार विद्यार्थीनींचे भविष्य् उध्वस्त करणाऱ्या प्राध्यापक तथा प्राचार्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

तथापि, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर येथील विद्यार्थिनींकडून संस्थेतील अध्यापकाविरुद्ध गैर वर्तणुकीबाबतची तक्रार माहे जानेवारी, २०१९ मध्ये संबंधित प्राचार्य यांचेकडे प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी पूर्ण झाल्यानंतर संस्थेतील अन्य अध्यापकाने माहे मे, २०१९ मध्ये तक्रारकर्त्या विद्यार्थिनींची सहमती नसताना आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेचे वृत्त दैनिक लोकमत समाचार या स्थानिक वृत्तपत्रात दि. ०३/०५/२०१९ रोजी प्रसिद्ध झाले आहे.

(२) व (३) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर येथील अध्यापकाने केलेल्या गैरवर्तणुकीप्रकरणी, संस्थेतील महिला तक्रार निवारण समितीतील सदस्यांच्या उपस्थितीत तक्रारकर्त्या विद्यार्थिनींची चौकशी करण्यात आली. सदर चौकशीअंती संबंधित अध्यापकास मौखिक समज देण्यात आली व सदर कार्यवाहीने विद्यार्थिनींचे समाधान झाल्याने अध्यक्ष, महिला तक्रार निवारण समिती यांनी अधिक चौकशीची आवश्यकता नसल्याचे लेखी अभिप्राय प्राचार्यांना सादर केले. त्याचप्रमाणे संबंधित अध्यापकाच्या वर्तणुकीमध्ये देखील मोठया प्रमाणावर सुधारणा झाली असल्याचे निवेदन संबंधित विद्यार्थीनींनी लेखी स्वरुपात प्राचार्यांना सादर केले आहे. या बाबी विचारात घेता, संबंधित अध्यापक किंवा प्राचार्य यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची बाब उद्भवलेली नाही.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील वसतीगृहातील दुषीत पाण्यामुळे विद्यार्थीनींची प्रकृति बिघडल्याबाबत

**(२५) * १३६४०० श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील यशवंत अल्पसंख्याक आणि मातोश्री जिजाऊ वसतीगृहातील दुषीत पाणी प्यायल्याने ६० मुलींची प्रकृति बिघडल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलींच्या वसतीगृहात आरओ प्लान्ट नसल्याने व फिल्टर असला तरी तो नादुरुस्त असल्याने मुलींना दुषीत पाणी प्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऐन परिक्षेच्या काळात अशा घटना घडत असुन ३ दिवस सतत दूषित पाणी पुरवठा केला जात असूनही संबंधित प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच भविष्यात असे प्रकार होऊ नयेत याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे, नमुद विद्यापीठामधील ६० मुलींना जुलाब, उलट्या व मळमळ होऊन आजारी पडल्या ही बाब खरी आहे. तथापि विद्यापीठाच्या वसतिगृहाचे दुषित पाण्यामुळे आजारी पडल्याचे स्पष्ट झाले नाही.

(२) हे खरे नाही, मुलींच्या वसतिगृहामध्ये यु व्ही फिल्टर बसविण्यात आलेले असून त्याची तपासणी व स्वच्छता दरमहा केली जाते. मनपाचे पाणी पिण्यासाठी पुरविण्यात येत असल्यामुळे आर.ओ.प्लान्ट बसवलेला नाही.

(३) व (४) प्रकरणी मुलीच्या आजाराचे कारण दुषित पाणी असल्याचे स्पष्ट झालेले नाही. तथापि विद्यापीठ प्रशासनाने प्रकरणाची दखल घेऊन खालील उपाययोजना केलेल्या आहेत.

१. यशवंतराव चव्हाण आर्थिकदुष्टया मागास विद्यार्थीनीच्या वसतिगृहात १००० लीटर प्रतितास क्षमतेचा आर.ओ.प्लान्ट उभारण्यात आलेला आहे.

२. रमाबाई आंबेडकर अल्पसंख्याक मुलींचे वसतिगृह, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह व मुलींचे वसतिगृह क्र. ३ येथे प्रत्येकी ५०० लीटर प्रतितास क्षमतेचा आर.ओ.प्लान्ट उभारण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरगुड (ता.गारगोटी, जि.कोल्हापूर) शहराच्या मैलामिश्रीत पाण्यामुळे वेदगंगा नदी प्रदुषित झाल्याबाबत

**(२६) * १३६३९४ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरगुड (ता.गारगोटी, जि.कोल्हापूर) शहराचे मैलामिश्रीत पाणी वेदगंगा नदीत मिसळून नदीचे पाणी प्रदुषित होऊन तेथील नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नदीच्या पाण्याचे शुध्दीकरण करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) प्रश्नाधीन विषयाबाबतची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व मुख्याधिकारी, मुरगुड नगरपरिषद यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे पुळकोटी (ता.माण, जि.सातारा) येथील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(२७) * १४०५५१ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पुळकोटी (ता.माण, जि.सातारा) येथील दुष्काळ तसेच मागील अनेक वर्षापासून पाणी पुरवठा करणारी विहिर आटल्यामुळे पाणीटंचाई निर्माण झाली असल्याचे दिनांक १ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विहिर ओढ्याच्या काठावर असून ओढ्यावर दोन बंधारे असल्यामुळे या ओढयात उरमोडीचे पाणी सोडले तर या गावाचा पाण्याचा प्रश्न दूर होईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ओढयात उरमोडीचे पाणी सोडण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

मौजे पुळकोटी, ता.माण, जि.सातारा येथील ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार दि.१५/१२/२०१८ पासून १,२१७ बाधित लोकसंख्येला २४,००० लि. क्षमतेची प्रतिदिन १ खेप तसेच दि.०१/०४/२०१९ पासून मोठी-३४५ व लहान-२१४ बाधित जनावरांसाठी १२,००० लि. क्षमतेची प्रतिदिन १ खेप व सहाव्या दिवशी २ खेपा असे एकूण ३८,००० लि. पाणी टँकरद्वारे पुरविण्यात येत आहे.
(२) व (३) होय.

मौजे पुळकोटी, ता.माण हे गांव उरमोडी प्रकल्पाच्या अधिसूचीत लाभक्षेत्राच्या बाहेर माण कालव्याच्या शेवटच्या ३१ कि.मी. च्या पुढे आहे. सद्य:स्थितीत उरमोडी प्रकल्पातील माण कालव्याचे २४ कि.मी. पर्यंतची कामे पूर्ण झाली आहेत. त्यापुढील २५ ते ३१ कि.मी. मधील कामे अंतिम टप्प्यात असून, डिसेंबर, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. ही कामे पूर्ण झाल्यानंतर व याबाबत जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडून मागणी प्राप्त झाल्यानंतर पुळकोटी येथील ओढयात उरमोडी उपसा सिंचन योजनेचे पाणी सोडणे शक्य होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मराठी तमाशा कलाकारांच्या मागण्यांबाबत

**(२८) * १३५८११ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला),**

**श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठी तमाशा कलाकारांच्या समस्या सोडविण्यासाठी मराठी तमाशा संघटनेने मा.मुख्यमंत्री, मा.सांस्कृतिक कार्यमंत्री व विभागाकडे दिनांक १४ जानेवारी, २०१९ रोजी दिलेले निवेदन दि.२८.०२.२०१९ रोजी सास्कृतिक कार्य संचालनालयास प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार तमाशा फडांना प्रतिवर्षी २० प्रयोगांना प्रती खेळ रु.३०,०००/- ऐवजी रु.४०,०००/- प्रमाणे अनुदान देणे, जिल्हा वृध्द साहित्यिक व कलावंत मानधन निवड समितीवर तमाशा कलाक्षेत्रातील सदस्य म्हणून नियुक्ती करणे, वृध्द कलावंताना मिळणाऱ्या मानधनात वाढ करणे तसेच सदर योजनेसाठी इष्टांक वाढविणे इ. बाबी शासन स्तरावर विचारधीन आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे. तमाशा फडांना अनुदान वाढीबाबत तसेच वृध्द साहित्यिक व कलाकार मानधनात व इष्टांकात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. जिल्हा वृध्द कलावंत मानधन समितीवर तमाशा कलाक्षेत्रातील सदस्य निवड करणेबाबतच्या सूचना सर्व जिल्हा परिषद यांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यातील शौचालय बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(२९) * १३७४७६ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती घाटंजी अंतर्गत (जि.यवतमाळ) तालुक्यातील २५ गावांतील स्वच्छ भारत मिशन अंतर्गत २५८७ शौचालय बांधण्याचे काम गुजरात येथील एका कंत्राटदाराला देण्यात आले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंत्राटदाराने बांधलेल्या शौचालयांची तपासणी व निरीक्षण न करता येथील कर्मचाऱ्यांनी जागेवर बसूनच तपासणी केली व २५ पैकी १० गावांतील शौचालय बांधकामचे अनुदान लाभार्थ्यांना न देता ठेकेदारांच्या नावे काढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदरहू प्रकरणी गैरव्यवहार करून ठेकेदाराच्या नावे देयके काढणा-या अधिका-यांविरुद्ध कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.

यवतमाळ जिल्हयातील ग्रामीण भागातील कुटुंबे हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे शौचालय बांधकाम करु शकत नाहीत, असे निदर्शनास आल्याने शासनाच्या दिनांक १६/०३/२०१८ च्या पत्रान्वये यवतमाळ जिल्हयामध्ये ग्रामपंचायतीमार्फत वैयक्तिक शौचालय बांधकाम करण्याची परवानगी देण्यात आली. त्याअनुषंगाने घाटंजी या आदिवासी बहुल तालुक्यातील २५ पैकी १० गावांमध्ये ग्रामपंचायतीमार्फत एकूण ४२२ वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम करण्यात आले. सदर वैयक्तिक शौचालय बांधकाम प्रोत्साहन अनुदान निधी पंचायत समितीस्तरावरुन ग्रामपंचायतीला वितरीत करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यात ८५ शाळा अनधिकृत असल्याबाबत

**(३०) * १३७१२९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण विभागाद्‌वारे जाहीर आकडेवाडीनुसार पुणे जिल्ह्यात ८५ शाळा अनधिकृत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शाळा अनधिकृत आहेत असा बोर्ड ही शिक्षण विभागाव्दारे लावण्यात येत नसून एकाही शाळेवर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली नसल्याने अशा शाळा अनधिकृतपणे सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण हक्क कायद्‌यानुसार शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतरही अनधिकृत शाळा सुरू राहिल्यास दंड आकारण्याची तरतूद असतांना मात्र गत वर्षभरात जिल्ह्यातील एकाही अनधिकृत शाळेवर कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा कारण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) अंशत: खरे आहे. पुणे जिल्हयामध्ये ६१ शाळा अनधिकृत आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) अनधिकृत असलेल्या शाळांवर कारवाई करण्याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. पुणे यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयात शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत

**(३१) * १३७०४९ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत तपासण्यात आलेल्या ३९१ पाणी नमुन्यापैकी ६७ पाणी नमुने दुषीत आढळल्याची बाब दिनांक १३ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दुषीत पाणी नमूने आढळून आलेल्या गावांना शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय. हे खरे आहे.

(२) पाणी नमुने दुषित आढळुन आलेल्या गावातील दुषित स्त्रोताचा परिसर स्वच्छ करण्यात आला असून ३३% क्लोरिन असलेल्या टि. सी. एल. पावडरद्वारे पाणी शुध्दीकरण करण्यात आले आहे आणि यापुढे नियमित पाणी शुद्धीकरण करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या कमी असल्याने गणवेशासाठी मिळालेला निधी परत गेल्याबाबत

**(३२) * १४०८०५ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेच्या १५३८ शाळेतील ७३ हजार विद्यार्थ्यांना शैक्षणीक सत्र २०१८-१९ मध्ये गणवेश वाटपाकरीता देण्यात आलेल्या ४ कोटी ३८ लक्ष रूपये अनुदाना पैकी ६९ हजार विद्यार्थी पात्र ठरल्यामुळे २४ लाखाचे अनुदान शासनास परत पाठविण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वर्ग १ ली ते ८ वी पर्यंतचा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व दारिद्रय रेषेखालील प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप केले जाते तर खुल्या व इतरमागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार जिल्हा परिषदांच्या शाळेची पटसंख्या वाढविणे तसेच इतर प्रवर्गातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत गणवेष वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे नाही.

(२) समग्र शिक्षा अभियान या केंद्र शासनाच्या योजनेतंर्गत इ. १ ली ते ८ वी मधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) आणि दारिद्रेरेषेखालील पालकांच्या पाल्यांना (विद्यार्थ्यांना) मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो.

(३) स्थानिक स्वराज्य संस्थांमधील इ. १ली ते इ.८ मधील योजनेच्या पात्र लाभार्थ्यांव्यतिरिक्त इतर विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयातील व्यायाम शाळा बांधकाम अनुदान व साहित्य वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३३) * १३५०४२ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात गत तीन-चार वर्ष व्यायाम शाळा बांधकाम अनुदान व साहित्य वाटप यामध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनासआले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी नेमलेल्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा, तहसीलदार व गटविकास अधिकारी बुलढाणा यांच्या चौकशी समितीने जिल्हा क्रिडा अधिकारी यांच्यासह चौकशी केलेल्या व चौकशी अहवालात दोषी असणाऱ्या ग्रामपंचायत रुईखेड टेकाळे तसेच ईरला, (ता.बुलढाणा) व गोतमरा, (ता.मोताळा जि.बुलढाणा) या ग्रामपंचायतीच्या संबधित दोषींवर कोणतीही दंडात्मक व फौजदारी कारवाई केली नसल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर २०१८ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गैरप्रकार करणाऱ्या संबंधित ग्रामपंचायतींकडून व्यायामशाळा बांधकाम अनुदानात अनियमितता व गैरप्रकाराबाबत वसुली व फौजदारी कारवाई करण्यास जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्याकडून हेतू पुरस्पर दिरंगाई केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) अंशत: खरे आहे.
(२) जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी नेमलेल्या चौकशी समितीने जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्यासह चौकशी केलेल्या व चौकशी अहवालात दोषी असणाऱ्या ग्रामपंचायत रुईखेड टेकाळे, ता.जि.बुलढाणा ला अनुदान वसुलीबाबत नोटीस पाठविण्यात आलेली आहे. तसेच इरला, ता.जि.बुलढाणा व गोतमारा, ता.मोताळा, जि.बुलढाणा या संस्थांचीसुध्दा चौकशी करुन आर.आर.सी.अंतर्गत मंजूर अनुदान वसुलीसाठी जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

(३) व (४) व्यायामशाळा बांधकाम अनुदानात अनियमितता करणाऱ्या ग्रामापंचायतींकडून अनुदान वसुलीची कारवाई सुरु असल्याने हेतु पुरस्पर दिरंगाई केली जात नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.